# आदिवासींच्या शैक्षणीक समस्या-एक समाजशास्त्रीय अभ्यास

**कु. पुनम सयाम**
संशोधक विद्यार्थिनी

---

**प्रस्तावना :**

जगातील अनेक वेगवेगळ्या आदिवासींच्या जमाती अस्तित्वात असल्याचे दिसते विशेष करून आशिया आफ्रिका आणि अमेरिका या खंडामध्ये आदिवासी जमातीचे प्रमाण सर्वाधिक आहे भारत देशात ही अनेक आदिवासी जमाती असतात त्यांची संख्या जवळ जवळ 415 च्या जवळपास आहे महाराष्ट्र मध्ये गोंडवाना, सह्याद्री गुलाम वंजारी आणि सातपुडा या तिन्ही प्रदेशात भिल्ल, कोरकू, गोंड, कोळी, परधान, कोलाम, बंजारा, कातकरी, ठाकूर, राजगोंड, कवर, पावरा, गावित, अशा जवळ जवळ 46 आदिवासी जमातीचे वास्तव्य खूप मोठ्या प्रमाणात आहे.

आदिवासी म्हणजे अगदीमूळचे रहिवासी. आदिवासी लोक प्रामुख्याने अभण्यामध्ये किंवा डोंगराच्या दऱ्याखोऱ्यात राहतात आदिवासी समाज प्रस्थापित समाजाकडून अनेक कारणांनी छळला गेला असून त्याच्या वाट्याला लाचारी व भटकंती आली आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत प्रत्येक क्षेत्रात विकास करण्याचे ध्येय प्रत्येक नागरिकाने स्वीकारले आहे. प्रत्येक नागरीकाला साक्षर करायचे ज्यातुन भारताचा सामाजिक आणि सांस्कृतिक विकास चांगल्या प्रकारे साधता येईल. प्रत्येक क्षेत्रात तसेच प्रयत्न चालू ही आहेत. भारताने प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत अनेक नवनवीन शिक्षणाची दालने उघडले व उपलब्ध करून दिली. भारतातच नव्हे तर भारताबाहेरील विकसित राष्ट्रांमध्ये शिक्षणासाठी भारतीय प्रतिभावंताना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिलेली आहे. कारण देशाच्या विकासामध्ये शिक्षणाला अतिशय महत्त्व आहे. कारण शिक्षण राष्ट्राच्या प्रगतीसाठीची एक महत्त्वूपर्ण गुतंवणूक मानली जाते. भारतीय राज्यघटनेत समाजातील सर्व घटकांना शिक्षण घेण्याचा हक्क दिला आहे तरीही. अजून काही घटकांपर्यत शिक्षण हवे तसे किंवा प्रत्येक गरजूं पर्यंत पोहोचलेले नाही. महाराष्ट्राचा विचार केला असता सद्यस्थितीत अनेक आदिवासी जमाती आहेत. आणि त्यांचा शिक्षणाचा तसेच त्याचा आर्थिक व सामाजिक विकासाचा मोठा प्रश्न भारतीय प्रशासनासमोर ठाण उभा आहे. डब्लू. जे. पेरी यांच्या मतानूसार "समान बोली बोलणाऱ्या व एका समान-भूप्रदेशावर वास्तव करणाऱ्या समूहाला आदिवासी समाज म्हणतात. इ. स. १९६२ शिलाँगमध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने केलेली व्याख्या पुढील प्रमाणे "एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या एका पूर्वजांपासून उत्पत्ती सांगणाऱ्या एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टिने मागासलेल्या, अक्षर ओळख नसलेल्या व रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रीतीरिवाजाप्रमाणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज असे म्हणतात.

महाराष्ट्र राज्यातील १९९१ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचे प्रमाण ६४.८७ टक्के आहे तर आदिवासीत हे प्रमाण ३६.७७ टक्के इतके आहे. त्यातही पुरूषांचे ४९.०० आणि स्त्रियांचे २४.०३ टक्के एवढे साक्षरतेचे

प्रमाण दिसून येते. आणि ते आजपर्यंत हवे ते वाढलेले दिसून येत नाही. आदिवासी समाजातील लोकांमध्ये साक्षरता कमी असल्यामुळे त्याच्या जीवनात अनेक समस्या उद्धवतात, त्यांना फसविले जाते अधिक काम करून त्याचा मोबदला खुप कमी दिला जातो. खुप मेहनत आणि त्याचा फायदा खुप कमी यामुळे या समाजाचा हवा तितका आर्थिक विकास होत नाही आणि जीवनमानात फरक दिसून येत नाही.

**आदिवासींची शैक्षणिक स्थिती :**

आदिवासी लोकांना शिक्षणाविषयी आवड नाही. मुले शाळेत शिक्षण घ्यायला जात नाही. मुलांना शिकवून काहीही उपयोग नाही. ही संकल्पना आदिवासींच्या मनात रुजली आहे. नोकरीपेक्षा आपली घरची कामे श्रेष्ठ असे आदिवासींना वाटते. शिक्षण न घेतल्यामुळे कित्येक आदिवासींना लिहता वाचता येत नाही. त्यामुळे त्यांच्या निरक्षरतेचा फायदा सावकार तय व्यापारी लोक येत आहेत. शासकिय योजनांचा लाभ देखील हया लोकांना मिळत नाही. अशिक्षितपणामुळे नविन दृष्टीकोन देखील आदिवासी लोक स्विकारण्यास तयार नाहीत. अजूनही औषधी जडीबुटीचा हे लोक वापर करीत आहेत. परंतु दवाखान्यामध्ये जाऊन उपचार घेत नाहीत हे मात्र विशेष, गावाच्या वैद्यांनी दिलेले औषधावर त्यांचा आजही विश्वास आहे. विज्ञानाच्या नव नविन संशोधनावर आजही त्यांचा विश्वास नाही. चंद्राला देव मानणारे आदिवासी लोक आजादी आहेत. असे असले तरी काही प्रमाणात शैक्षणिक बदल थोडयाफार प्रमाणात होत असल्याचे दिसून येत आहे.

आदिवासी शिक्षण हा अत्यंत नाजूक विषय असून, या शिक्षणाचे आपण दोन प्रकार करू शकतो. एक म्हणजे, या समाजाचे पारंपारिक शिक्षण, जे त्यांना युवागृहातून मिळते, जे त्यांना घरातील मोठी माणसे, मित्र-मैत्रिणी, आई-वडील किंवा घरातील इतर मंडळी, आप्तजन यांच्याकडून मिळते. या शिक्षणात त्यांचे पारंपारिक ज्ञान, संस्कृती, पद्वती, रितीरिवाज इतकेच काय, तर शेतातील कामे, घरबांधणी, घरदुरूस्ती, मासेमारी, शिकार आणि त्यासाठी लागणारे साधने, हत्यारे बनविणे किंवा भगताला आवश्यक असे झाडपाल्याच्या औषधींचे, मंत्र-तंत्राचे काम या प्रकारचे सर्व शिक्षण अगदी बिनबोभाटपणे पारंपारिकरीत्या चालत येते ते मिळते. प्रत्येक जण आपल्या कुवतीप्रमाणे, आपल्या पद्धतीप्रमाणे, आवडीप्रमाणे हे शिकते. परंतु यामध्ये युवागृहासारख्या संस्थांचे प्रमाण कमी होत असल्याने तेथून मिळणा-या शिक्षणावर मर्यादा येत आहे. शिवाय आधुनिक किंवा औपचारिक शिक्षण जे शालेय स्वरूपाचे अहे, त्याच्या प्रगतीचा वेग जसा वाढत आहे, त्या प्रमाणात पारंपारिक शिक्षणाकडे तरूणवर्गाचे आणि विशेषतः शिक्षित लोकांचे दुर्लक्ष होत आहे.

**आदिवासीच्या शैक्षणिक समस्या :**

आदिवासीच्या समस्या ह्या त्यांच्या मूळ समाज जीवन पद्धतीत असल्याचे दिसते त्यामध्ये पण येथे आपण हे लक्षात घेतले पाहिजे की आदिवासी समाज निर्धन असेल, निरक्षक असेल पण तो असंस्कार नाही. त्याची स्वतःची अशी एक बोली असून तिच्या मार्फतच संवाद साधला जातो. शिक्षणामुळे कोणताही समाज प्रगती करून सामाजिक दृष्ट्या तो सुसंस्कृतीत होण्यास मदतच होते. शिक्षकांमुळे समाजजीवन अधिक सुखकर होते. शिक्षणामुळे समाजजीवन अधिक सुखकर होते. अनेक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आपल्याला शिक्षणाची गरज असते.

आदिवासी समाजाची शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली तरी त्याना साक्षर होण्यासाठी केवळ सुविधा हया पूर्ण होवू शकत नाही. काही अनेक गोष्टी अशा आहेत ज्या पूर्वी पासून असतील किंवा दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या समस्या असतील ज्यामुळे ते आजही शिक्षणाचा हवा तसा लाभ घेवू शकत नाही आणि हवे तसे आपले सामाजिक व सांस्कृतिक जीवन उंचावू शकत नाही.

१. आदिवासी समाजातील दारिद्रय, धर्मभोळेपणा, अंधश्रध्दा आणि मोठयाप्रमाणात असलेले अज्ञान.
२. आदिवासींना मुलांचा व्यवसायात होणारा उपयोग.
३. नोकरी करणारा मुलगा जवळ न राहण्याची मोठी भिती.
४. आदिवासी जमात महाराष्ट्रातील डोंगरी भागात वास्तव्य करीत असल्यामुळे त्यांना मोठ्ठ्या प्रमाणात भोतिक सुविधांचा अभाव जाणवतो.
५. बोली भाषेची समस्या
६. दुर्गम भागातील रटाळ अध्यापन व नवतंत्रविज्ञानातील अज्ञान
७. शाळेचे अनाकर्षक वातावरण
८. कुपोषण
९. संपर्कसाधनाचा अभाव
१०. मुलींच्या शिक्षणाबाबतीतील उदासिनता
११. अभ्यासक्रम आणि जीवन यामध्ये सुसंगती नसणे
१२. शिक्षणसंस्था चालविण्यासाठी वेगवेगळया समस्या निर्माण होणे.

वरील अनेक समस्या आदिवासी बांधवाना शिक्षणापासून वंचित ठेवत आहेत. आदिवासी बांधवाची वस्ती विखुरलेली असल्यामुळे शिक्षणासाठी पायी चालत जावे लागते. कमीत कमी ३ ते ५ मेल पायीपीट करून शाळेपर्यंत पोहचावे लागते यामुळे ही लहान मुले शाळेकडे आर्कषित होत नाही.

आदिवासी मुलांच्या बाबतीत सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे ती भाषेची होय. शाळेतील शिक्षण हे मराठी माध्यमातून उपलब्ध असते. सर्वानाच मराठी भाषा समजत नसल्यामुळे हया मुलांना सुरूवातीला थोडी समस्या जाणवतेच परंतु सुरूवातीचा काळ महत्त्वपूर्ण असतो. आणि वर्गातून मुलांची संख्या हळूहळू कमी होते.

एखादया मुलांला शासकीय नोकरी मिळाली तर तो आपल्यापासून दूर जाईल तो आपल्या जवळ राहणार नाही. हया भितीपोटी बहूतेक आदिवासी बांधव आपल्या मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवतांना दिसून येतात.

आदिवासी बांधवाना दारिद्रयामुळे शिक्षणाची आवड नाही. मुलगा शाळेत टाकून आर्थिकदृष्ट्या त्यांना ते परवडत नाही. दारिद्रय आणि शिक्षण याचा त्यांच्या जीवनात पाठशिवणीचा खेळ खेळतात. (गारे, २००९)

आदिवासी समाजात शिक्षणांचा प्रसार हा खुप कमी झाला आहे. अनेक ठिकाणी भौतिक सुविधांचा अभाव असल्याने त्यांच्यापर्यंत शिक्षक हा पोहचूच शकत असेल नाही. परंतु शासनाच्या योजना असूनही शिक्षक पाहेचत असेल तरीही तेथील उदासिनता शिक्षणाचे महत्त्व या बांधवाना समजू देत नाही आणि त्यांना

शिक्षणापासून वंचित ठेवत असते.

अभ्यासक्रम आणि जीवन यांच्यात मेळ नसल्यामुळे शिक्षण घेवूनही त्याचा फायदा त्यांना होत असेलच असे नाही त्यामुळे शिक्षण विषयक उदासीनता, दुर्गम भागातील रटाळ अध्यापन व नवतंत्रविज्ञानातील अज्ञान, सोयो सुविधाचा अभाव तेथील शिक्षणात मोठा अडसर दिसून येतो.

**आदिवासी समाजाच्या शिक्षणासाठीचे प्रयत्न :**

१. एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत सकसआहार योजना प्रभावीपणे राबविणे. मोफत गणवेश पुरवठा योजना प्रभावी करणे, युनिसेफ पुरस्कृत बालशिक्षण प्रकल्प राबविणे, खडुफळा योजना कार्यान्वित करणे.

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पुढील योजना सुचविलेल्या आहेत आदिवासी भागात अधिक प्राथमिक शाळा सुरू करणे, आदिवासी बोलीतून अभ्यासक्रम तयार करणे व अध्यापनाच्या साहित्याची निर्मिती करणे, आदिवासी तरुणांना प्रशिक्षण देणे, वसतिगृहे आश्रमशाळा निर्माण करणे, शिष्यवृत्त्या देवून प्रेरणा देणे, आदिवासी भागात अंगणवाडया, अनौपचारिक व प्रौढ शिक्षण केंद्र स्थापन करणे, आदिवासी संस्कृती व प्रतिभा यांची जाणीव लक्षात घेवून अभ्यासक्रम आखणे.

३. अंदाजपत्रकात राखीव निधी/ रकमेची तरतुद, शबरी महामंडळ स्थापन करणे, आश्रमशाळा, अंगणवाडी -अनुताई वाघ

आश्रमशाळेतून अशा विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरित करून त्यांचा विकास साधणे. आदिवासीच्या विकासाचा विचार केला तर त्यांच्यातील पदवीधरांनाच आश्रमशाळेचे संचालन, शिक्षक, गृहपती जी आवश्यक पदे असतील ती दिली जावी यातुन आदिवासीच्या सर्वांगिण विकासाला आदिवासीतील प्रतिभावंत हितावह ठरणार आहेत. आदिवासी भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठो पूर्व माध्यमिक व माध्यमिक स्तरांवर विद्यावेतन देणे. आदिवासी आणि ग्रामीण भागातील प्रतिभांवत मुलांसाठी त्यांचा प्रतिभेचा विकास होण्यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना राबविणे. आदिवासी बोलीभाषेचा प्रकल्प कार्यान्वित करणे आदिवासी मुलांच्या बाबतीत सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे ती भाषेची होय.

**संदर्भसूची :**

- नाडगोंडे, गुरूनाथ, (2004 तृतीय आवृती), भारतीय आदिवासी, पुणे; कॉन्टिनेन्टल प्रकाषन. पुष्ट क्र. 1
- गारे, गोविंद, (2009), आदिवासींचे शिक्षण, औरंगाबाद; साकेत प्रकाशन प्रा.लि. पुष्ट क्र. 20-23.
- आकरे, बी. एन.,(2009), आदिवासी जिवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम, नागपूर पिंपळापुरे बुक डिस्टीबुटर्स पुष्ट क्रं. 3.
- फडके, सुधीर, (1963), महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, पुणे; जोषी आणि लोखंडे प्रकाशन, पुष्ट क्रं. 19,103.
- क-हाडे, बाबू, (2004), आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, नागपुर; मानवता सांस्कृतिक विकास व शोध केंद्र चामोर्शी, हिंद मुद्रणालय महाल, पुष्ट क्रं. 4.